# मध्य भारत



माधुरी अरविंद नाईक

# मध्य भारत

## महेश्वर, मंडु, इंदोर, उज्जैन, ओंकारेश्वर, देवास


# माधुरी अरविंद नाईक



ई साहित्य प्रतिष्ठान

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मध्य भारत

महेश्वर, मंडु, इंदोर, उज्जैन, ओंकारेश्वर, देवास


लेखिका : माधुरी अरविंद नाईक

madhuri.jadhav26@yahoo.co.in

Contact no. 9820234891

माधुरी अरविंद नाईक

लक्ष्मी पार्क फेज -२, बिल्डिंग नंबर ५

फ्लॅट नंबर – ६०४

लोकमान्यनगर, ठाणे- पश्चिम

मोबाईल नंबर- ९८२०२३४८९१

ईमेल- madhuri.jadhav26@yahoo.co.in

ब्लॉग : http://bhramangiri.blogspot.in/



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : २६ जानेवारी २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.



मी माधुरी अरविंद नाईक आपल्या ई साहित्यची नियमित वाचक आहे. मी ई साहित्यचा दुर्ग दुर्गट भारी हा विभाग संभाळते. शिक्षणाने मेकॅनिकल इंजिनियर. आणि वृत्तीने भटकी. नवऱ्यालाही भटकण्याची आवड. लग्नानंतर जास्त भटकंती झाली. आता मुलगाही तसाच आहे. त्यामुळे आमचं कुटुंब एक भटकं कुटुंब आहे.

सर्वात प्रथम मी ई साहित्यचे रायगड हे पुस्तक वाचले. पुस्तक अतिशय माहितीपर आणि लक्षवेधक होते. पुस्तकामध्ये ई साहित्यचा पत्ता दिलेला होता. तो टाण्यातला. मग तर वाचुनच खुश झाले. आपल्या ठाण्यात असे काही आहे. माझ्यासाठी हेही भटकंतीचे एक नविन ठिकाण होते. तेव्हा नामकाकांना (सुनिल सामंत) भेटलो.

तरी डोक्यात एक विचार चालु होता. हां ह्यांना काही विशेष काम नसेल म्हणुन एवढे ईबुक्स करायला वेळ मिळत असेल. पण जशी जशी ओळख होत गेली तसे कळाले. असे काहीही नाही. सर्व आपल्या नोकरी, व्यवसायात तेवढेच व्यस्त आहेत. ई साहित्य हे एक वेड आहे. त्यात सामिल झाले की मजाही येते आणि वेळ ही आपोआप मिळतो. दरवर्षीचे साहित्य संमेलन ही आमच्यासाठी एक पर्वणीच असते. माझा साडेचार वर्षाचा मुलगा ही खुप आनंद घेतो. मागच्या वर्षी संमेलनात त्याचे ईबुक्स- फ्री बुक्स हे अगदी जोरात चालु होते. सामंत काकांना २०११ मध्ये भेटलो. काकांनी विचारले तुम्ही काही लिखाण करता का? आम्ही लगेच “बापरे लिखाण नाही करत” असे सांगितले. त्यावर काका बोलले तुम्हाला फिरायला आवडते ना मग त्याबद्दल लिहा असे सुचवले. आम्हीही बोललो प्रयन्त करतो.

त्यानंतर २०१२ मध्ये खांदेरी - उंदेरी हे माझे पहिले ई बुक प्रकाशित झाले. हे पुस्तक आम्ही दोघे अरविंद आणि मी चार महिने टाईप करत होतो. पहिलीच वेळ असल्याने अगदी भारावल्यासारखे कामावरुन

आल्यावर सगळी कामे  आटोपल्यानंतर रात्री टाईप करत होतो. जुलै २०१२मध्ये खांदेरी - उंदेरी प्रकाशित झाले. त्यानंतर कुठे गेले की सर्व माहिती नीट घेण्याची सवय लागली. प्रत्येक ठिकाणाकडे बघण्याची दृष्टी बदलली. जळगावला फिरत असताना आम्ही बहादुरपुरला सर्व चौकशी करत होतो. तेथिल लोकांना वाटले आम्ही पत्रकार आहोत की काय. असे बरेच सारे अनुभव आहेत. त्यासाठी संमेलनात भेटु आणि गप्पा मारु. आतापर्यन्त माझी, खांदेरी-उंदेरी, माहुली किल्ला, किल्ले सिंधुदुर्ग, जळगाव पारोळे किल्ला, सातारा आणि आजुबाजुचा परिसर, कर्नाटक दर्शन - ह्म्पी, बदामी, ऎहोळे, पुणे जिल्हा १ व २ अशी आठ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. लवकरच आपले ठाणे, वैष्णोदेवी एक अद्‌भुत अनुभव,  हैदराबाद ही बुक प्रसिद्ध केली जातील. ई साहित्य खरच एक प्रसन्न अनुभव आहे. ह्या मधुन खुप शिकायला देखिल मिळाले. अनेक साहित्यिक मित्र- मैत्रीणी भेटले.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या “ग्रंथ तुमच्या दारी” आणि “बाल ग्रंथालय” सोबत मी ६वर्षे आहे. ते हार्ड बुक आहेत. आणि ई साहित्त्यच्या नावातच ई बुक आहेत. नाशिकचे कुसुमाग्रज प्रतिष्टानचीही बुक वाचकांना विनामुल्य दिली जातात. दोंघासोबत काम करताना अतिशय आनंद आणि मजा येते. आदर्श सार्वजनिक वाचनालय, यशोधनगर ठाणे येथे लायब्ररीचे कमिटीवर काम बघताना खुप पुस्तकांच्या वाचनाचा आनंद मिळतो.

माधुरी अरविंद नाईक

लक्ष्मी पार्क फेज -२, बिल्डिंग नंबर ५

फ्लॅट नंबर – ६०४

लोकमान्यनगर, ठाणे- पश्चिम

मोबाईल नंबर- ९८२०२३४८९१

ईमेल- madhuri.jadhav26@yahoo.co.in

http://bhramangiri.blogspot.in/ ह्या माझ्या ब्लॉगला अवश्य भेट द्या.

माझ्या आयुष्याच्या प्रवासात भागिदार होऊन

स्वतः ॲक्सिलरेटर आणि ब्रेक संभाळत

स्टिअरिंग माझ्या हातात सोपवणाऱ्या

अरविंदला हे माझे नववे पुस्तक अर्पण करते.

-माधुरी अरविंद नाईक

# महेश्वर, मंडु, इंदोर, उज्जैन, ओंकारेश्वर, देवास

अद्वेद माधुरी अरविंद नाईक-९८२०२३४८९१,

कोमल किरण जाधव -९८९००१४५१७

दसऱ्याला तीन दिवस सुट्टी लागून आल्यामुळे अजून दोन दिवस जोडुन पाच दिवसाची ट्रीप ठरवली. जवळच कोठे तरी जायचे असा विचार चालू असताना भावाची कंपनी मिळाली. मग चौघांनी मिळून मंडु, इंदोर, उज्जैन, ओंकारेश्वरला जाण्याचे ठरवले. सर्वात पहिले आम्ही महेश्वरला जाण्याचे ठरवले. त्यानुसार आम्ही ३० सप्टेंबर २०१७ ला सकाळी ८. ३० ला कार घेऊन ठाणे वरुन निघालो आणि तिकडे संध्याकाळी ५. ३० च्या दरम्यान पोहोचलो. आमचा राष्ट्रीय महामार्ग ३ मुंबई – आग्रा वरुन प्रवास चालू झाला वाटेत जाताना नाशिकच्या अलिकडे एक श्री धर्मचक्र पार्श्वनाथ प्रभाव जैन स्वेताम्बर जैन तिर्थ रस्त्यालगतच आहे. तिथे धावती भेट घेतली. रस्त्यात मध्ये धुळेच्या अगोदर सोनगिरला प्रसिद्ध शेव भाजी खाल्ली आणि पुढचा प्रवास चालू केला. त्या दिवशी दसरा असल्याने जागोजागी रावणाचे पुतळे तयार करण्यात आले होते. ठाणे ते महेश्वर हे अंतर ५०० किमी. आहे.





महेश्वर हे मध्यप्रदेशातील खरगोन जिल्ह्यातील इंदोरहून अंदाजे ९१ कि. मी वर नर्मदा नदीच्या काठावरील एक रम्य ठिकाण आहे. महेश्वर हे ऐतिहासिक स्थळ आहे. 'पुण्यश्लोक राणी अहिल्येच्या गावात आपले

स्वागत असो’. ह्या फलकानेच आपले गावात स्वागत होते. गावाची वेस ओलांडता ओलांडताच लक्षात येते की, गावावर अजूनही राणीचे राज्य आहे आणि ती राणी ‘पुण्यश्लोक’ आहे. गावात प्रथमदर्शनी अस्वच्छता दिसते. पण पुढे मध्यप्रदेश सरकारने नर्मदा रिट्रीट रिसॉर्ट अतिशय सुंदर लोकेशनवर बांधलेले आहे









राणी अतिशय धार्मिक होत्या. त्याची ओळख त्यांच्या वाड्यात असलेले पुजेचे साहित्य बघून होते. त्यांनी वास्तव्य केलेल्या वाड्यात त्यांच्या वापरातील वस्तू सुबक रितीने मांडून ठेवलेल्या आजही पहावयास मिळतात. भारतात ठिकठिकाणी त्यांनी बांधलेल्या धर्मशाळा व घाट त्यांच्या धार्मिक असल्याची ग्वाही देतात. महेश्वरातील मंदिरेही प्रसिद्ध आहेत. कालेश्वर, राजराजेश्वर, विठ्ठलेश्वर व अहिल्येश्वर ही मंदिरे खास करून पाहण्यासारखी आहेत. अहिल्याबाई या जनतेप्रती कनवाळू व गुन्हेगारांप्रती कठोर शासक


म्हणून प्रसिद्ध होता. आपल्या मुलालाही त्याच्या गुन्ह्याबद्दल त्यांनी हत्तीच्या पायी देऊन मारले होते, अशी कथा आहे. अहिल्याबाई यांची रोज वापरायची खोली अत्यंत साधी आणि छोटी आहे. हे बघूनच त्यांचे साधेपण दिसून येते. बाजुलाच किल्ल्याच्या काही भागात हॉटेल केलेले आहे.

अहिल्याबाई यांची गादी:















## महेश्वरी साडी



महेश्वरी साडी संपूर्ण सुती साडी असते किंवा सुती ताणा (उभे धागे) आणि रेशमी बाणा (आडवे धागे) अशा पद्धतीने ही विणली जाते. महेश्वरी साडीचे काठपदर रंगीत पण इतर साडय़ांपेक्षा अरुंद असतात. त्यावर जरीकाम करून चौकडी किंवा उभे/आडवे पट्टे यांचे डिझाइन विणले जाते. पदर नेहमी गडद रंगांचा असतो. पूर्वी राजघराण्यापुरती वापरली जाणारी साडी आता देशात-परदेशात दूरवर वापरली जाते.

दुसऱ्या दिवशी १ ऑक्टोबरला सकाळी आम्ही महेश्वर किल्ला, राजवाडा, राजराजेश्वर मंदिर, काशी विश्वनाथ मंदिर बघितले.

महेश्वरमधे छोटी मोठी अनेक मंदिरे आहेत. किल्ल्यावर मात्र सर्वत्र लोकांची वस्ती वाढलेली आहे..

## शिव दत्त धाम, जलकोटी, सहस्त्रधारा





हे मंदिर अलिकडेच बांधण्यात आलेले आहे. महेश्वर पासुन ६ किमीवर वसलेले आहे. जाताना सिमेंटचा रस्ता बनवण्याचे काम चालू होते. मोठ्या आवारात एकमुखी दत्ताची मूर्ती आहे. नर्मदा मातेची, गणपतीची मूर्ती आहे. समोरच सहस्त्रधाराला जाण्यासाठी रस्ता आहे. आम्ही गेलो तेव्हा पाणी खूप कमी होते व बरेच आत चालून गेल्यावर जलस्त्रोत होता त्यामुळे आम्ही लांबूनच बघून परत निघालो.  त्याच दिवशी आम्ही मंडुला जाण्याचे ठरवले.  मांडु तिथुन ४० किमीवर आहे. मांडु धार जिल्ह्यात येते. आज हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे.

# मांडु/मांडव/मंडु

१ ऑक्टोबरला त्याच दिवशी आम्ही मांडुला गेलो.  मांडु किंवा मंडु असे दोन्हीही बोलले जाते. मांडुमध्ये सिताफळाचा सिझन असल्यामुळे सर्वत्र ताजी सिताफळ विकायला आली होती. सर्वांनी मनसोक्त सिताफळे खाल्ली.

मालवा रिट्रीट व मालवा रिसॉर्ट ह्या मध्य प्रदेश सरकारच्या दोन उत्तम सुविधा मांडुला आहेत. मालवा रिसॉर्टमध्ये आम्ही दुपारचे जेवण केले. रिसॉर्ट अतिशय सुंदर आहे. नंतर मंडु फिरायला सुरवात केली. मंडुला हॉटेल कमी आहेत.

राणी रूपमती आणि बाज बहादूरची एक प्रसिद्ध ऐतिहासिक प्रेमकथा आहे. बाज बहादूर हे मंडूचे अखेरचे स्वतंत्र राजा होते, रुपमती एक शेतकरी मुलगी आणि गायक होती. ती दिसायला अतिशय सुंदर होती. त्यापेक्षा तिचा आवाज अधिक सुंदर होता. त्यामुळे तिच्यावर मोहीत होऊन बाज बहादूरने तिच्याशी अंतर्धार्मिक लग्न केले. ह्या रुपमतीच्या गुणांबद्दल जेव्हा अकबर राजाला कळाले तेव्हा त्याने बाज बहादुरला पत्र पाठवुन रुपमतीला दिल्लीला पाठवा असे सांगितले. हे वाचून बाज बहादुरने अकबर राजाला उलट उत्तर पाठवले की तुम्ही तुमच्या बेगम ला इकडे पाठवा.  हे उत्तर वाचून अकबर खूप संतापला व त्याने मंडु वर हल्ला केला त्यात बाज बहादुरला अकबराने बंदी बनवले. आणि राणी रूपमतीला अकबराचे सैन्य न्यायला येणार होते असे समजले तेव्हा तिने त्यांच्या सोबत जाण्यापेक्षा  स्वत: हिरा गिळून आत्महत्या केली. अशा प्रकारे त्यांची प्रेमकहाणी सुरु होण्यापूर्वीच संपली. बाकी बरेच काही जाणून घेण्यासाठी तर आपल्याला त्या प्रेमनगरीत जायला हवे.

राणी रुपमती आणि बाज बहादुर वर १९५० मध्ये फिल्म पण आली होती. ज्यामध्ये निरुपा राय आणि भारत भुषणने काम केले होते.











## रेवा कुंड आणि राणी रूपमती पॅव्हिलियन







## <u>बाझ बहादुर महाल</u>

राणी रुपमतीमहाल मधून बाझ बहादुरचा दिसणारा महाल








2/3



## जहाज महल, मंडु

रुपमती महालापासुन थोड्याच अंतरावर जहाज महल आहे. घियास -उद -दिन-खिलजी ह्या सुलतानाने जहाज महल  बांधला आहे. त्याने ३१ वर्ष राज्य केले. त्याच्याकडे असलेल्या स्त्रियांच्या निवासाची नीट व्यवस्था होण्यासाठी ह्या सुलतानाने जहाज  महल  बांधला. कापुर तलाव आणि मुंज तलावाच्या मध्ये जहाज महल आहे. जहाज महलचा परिसर बराच मोठा आहे. जहाज महलाचे काम देखिल अतिशय सुंदर आहे. काही ठिकाणी कलात्मक पद्धतीने चॅनेलमधून पाणी आजुबाजुला वाहून नेलेले दिसते. जहाज महल हा ११० मीटर लांबी आणि रुंदी १५ मीटर आहे. हा महाल दुमजली इमारत आहे. जो मुंज तलाव आणि कपूर तलाव दरम्यानच्या जमिनीवर आहे. आजुबाजुला पाण्याने घेरलेला असल्याने याला जहाज महाल हे नाव दिलेले आहे. जहालमहलमध्ये जमिनीवर ३ मोठे हॉल आहेत. हे सर्व हॉल कॉरिडॉर द्वारे जोडलेले आहेत. जहाज महालाच्या पुढेच हिंदोला महल, गादा शाह पॅलेस, मुंजा तलाव, अशरफी महल इत्यादि ठिकाणे आहेत. हे सर्व एकाच तिकीटमध्ये बघता येते. होशंगा शाह समाधी, जामी मशीद ही ठिकाणे देखिल आहेत. ह्यासाठी तुमच्याकडे पुरेसा वेळ हवा. आम्ही पुढे मांडूहून इंदोरला जाणार होतो.












**होशांग शाहची कबर:** भारताची पहिली संगमरवरी रचना, हे अफगाण वास्तुकलाचे सर्वात सुरेख उदाहरणांपैकी एक आहे. जहाज महालापासुन अर्धा किमी अंतरावर आहे.





# <u>इंदोर</u>

मंडुहून इंदोर १०० किमीवर आहे. इंदोरला जाताना मध्ये एक चारपाय ढाबा लागला तेथे दुपारचे जेवण केले. ढाबा खुप प्रशस्त आहे. मध्ये मध्ये ट्रकवर लिहलेली वाक्ये सर्वत्र आहेत. कारण ढाबा म्हणजे ट्रक वाल्यांचा महत्वाचा थांबा. थोडासा महाग आहे पण आहे मात्र नेहमीपेक्षा वेगळा.








वाटेत जाताना रस्त्यात एक डायनासोर पार्क दिसले. रस्त्याच्या बाजुलाच असल्याने पार्कला लगेच भेट दिली. नाममात्र पाच रुपये तिकीट आहे.





रात्री मांडु बघून इंदोरला आम्ही मुक्कामी गेलो. ह्या वेळेस स्वत:ची गाडी असल्यामुळे सर्वत्र फिरण्याला वेळ मिळाला. संध्याकाळी आम्ही तिथे पोह्चलो. फ्रेश होऊन पहिल्याच दिवशी रात्री सराफा बाजारातील खाऊ गल्लीत जेवायला गेलो. ही गल्ली रात्री तेथील दुकाने बंद झाल्यावर चालू होते.

कोकोनट क्रश हे आमच्यासाठी नविन असलेले पेय ट्राय केले. गराडु ही एक आदिवासी डिश फ़ेमस आहे. गराडु म्हणजे एक कंद आहे. ते तळून केले जाते. तिकडे स्पेशल गराडु मसाला मिळतो. ते खाल्ले असता सर्दी अजिबात होत नाही. झी मराठी वर आम्ही सारे खवय्ये मध्ये गराडुची रेसिपी बघितली होती. युट्युबवर आपल्याला रेसिपी बघायला मिळेल. दही वडा, बिना तळलेला समोसा, भेळ, पाणीपुरी, असे वेगवेगळे प्रकार होते. जोशी यांचा दही वडा प्रसिद्ध आहे. पाणीपुरी मध्ये १० फ्लेवर होते.  येथील रबडी एकदम झकास होती. वेगवेगळया मसाला पानांची दुकाने होती. येथे मात्र बरीच गर्दी होती.






**गोमतगिरी -** जैन तीर्थक्षेत्र आहे. हे स्थान स्वच्छ, सुबक आणि सुंदर आहे. येथील भव्य फरसबंद आवारात बाहुबलीची विशाल मूर्ती आहे.

**नखराली ढाणी -** इंदूर ते महू रस्त्यावर राऊमध्ये १९९५ पासून वसलेले, एक संस्कृती-ग्राम-निकेतन आहे. येथे प्रवेश करण्यासाठी शुल्क आहे. मात्र त्यात भोजनही समाविष्ट आहे. येथे राहण्याचीही व्यवस्था आहे. पण येथे आम्ही गेलो नाही.





सोमवार सकाळी इंदोर दर्शन साठी बाहेर पडलो.  अन्नपुर्णा देवीचे दर्शन घेतले. त्याच्याच मागे वेद मंदिर होते. त्यानंतर आम्ही काच मंदिर बघायला गेलो. ह्या मंदिरात सर्वत्र काचा आहेत. असे मंदिर आम्ही हरिद्वार ला बघितले होते. पण येथे लादी देखिल काचेची होती. तेथील प्रसिद्ध राजवाडा सोमवार असल्याने बंद होता. त्यामुळे आम्ही बाहेरुनच राजवाडा बघितला.

**बिजासन माता मंदिर**

नंतर आम्ही बिजासन माता मंदिरला गेलो. हे मंदिर शहरापासुन १० किमी. अंतरावर आहे.  इंदोर विमानतळ येथुन जवळ आहे. ह्या मंदिरासाठी थोड्या पायऱ्या चढुन जाव्या लागतात. मंदिर फार जुने आहे. पण आजुबाजुचा परिसर साफ नाही.

**जुना राजवाडा -** हा वाडा होळकर घराण्याचा असून सात मजली आहे.

## रिजनल पार्क

पिपल्याना अट्ल बिहारी रिजनल पार्क फार मोठ्या जागेवर विकसित करण्यात आली आहे. प्रवेश फी मोठ्यांसाठी २५ रुपये व लहानांना १० रुपये आहे. पार्क मध्येच पाण्याचा कालवा आहे. अलिकडेच मालवा मिनी क्रुझ तलावामध्ये चालवली जाते. ह्या क्रुझसाठी पाउण तासाचे २०० ते २५० रुपये आहेत. अधिक माहिती मालवा क्वीन गुगल वर सर्च केल्यास मिळते.









आज रात्री आम्हाला उज्जैनला पोहचायचे होते. ह्या वेळेस आमच्या ह्या ट्रिपमध्ये कुठेही पहिले हॉटेल बुक केलेले नव्हते. त्या त्या दिवशीच आम्ही हॉटेल बुक करत होतो. त्यामुळे गाडीत तो एक वेळ जात होता. माझ्याकडे पुढे बसुन रस्त्यावरील फलक वाचण्याचे काम होते. किरण, कोमल हॉटेल बुक करण्यात बिझी होते. अद्वेद झोपण्यात, मामा-मामी बरोबर खेळण्यात, खाऊ खाण्यात दंग होता. आणि आमचे हे म्हणजे अरविंद गाडी चालवत होते. संध्याकाळी ६ पर्यंत आम्ही उज्जैनला पोहचलो. चला आता उज्जैन फिरुया.

# उज्जैन

उज्जैन(उज्जयिनी) भारताच्या मध्यप्रदेश राज्यातील एक प्रमुख शहर आहे. हे शहर क्षिप्रा नदीच्या किनारी वसले आहे. या शहराला ऐतिहासिक वारसा असून पूर्वी विक्रमादित्यच्या राज्याची राजधानी येथे होती. तसेच प्रख्यात महाकवी कालिदास यांची ही नगरी आहे. या शहराला मंदिरांचे शहर म्हणतात कारण शहराच्या परिसरात असलेली अनेक प्राचीन, सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण हिंदू मंदिरे. उज्जैनला आम्ही पोहचलो तेव्हा संध्याकाळचे ६ वाजले होते. पटकन फ्रेश होऊन आम्ही क्षिप्रा घाट आरती बघण्यासाठी आलो. सर्वात प्रथम आरती बघण्याचे ठरवले कारण नंतर मंदिर चालू असते. आधी मंदिरात गेलो असतो तर मग आरती मिळाली नसती. घाट आरती बघण्यासारखी असते. अगोदर हरिद्वारला, काशीला गंगा आरती बघितल्या होत्या. तिथे फार गर्दी असते. त्यामानाने येथे गर्दी कमी होती. आरती बघून काठावर थोडया भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगा खाल्या. अद्वेदने तेथे लहान मुलांची बॅटरी गाडी चालवली. थोड्या वेळाने उज्जैनच्या महाकालेश्वराचे शिवलिंगाचे दर्शन घेतले. मंदिरामध्ये जाताना मोबाईल फोन, पर्स आत न्यायला परवानगी नाही. सगळे आम्ही गेटवर जमा करुन आत गेलो. मंदिरपरिसरामध्ये निवांत वेळ घालवला. तिथे काही फोटो काढुन घेतले. आजुबाजुला छोटी छोटी मंदिरे आहेत. मध्य प्रदेश वनखात्याचे तिथे एक आयुर्वेदिक दुकान पण आहे त्यात थोडी खरेदी केली. नंतर रुम वर परत गेलो. जेवणाची वेळ झालीच होती. रात्री पायीपायी जाउन थोडी माहिती घेतली व जेवुन परत आलो. दुसऱ्या दिवशी परत मंदिरात जाऊया असा विचार केला. पण वेळे अभावी टाळले.



महाकालेश्वरला अनेक शिवमंदिरे आहेत. पण त्यामध्ये खालील ८४ मंदिरे प्राचिन आहेत. त्यांची यादी खाली दिली आहे. तिथे प्रत्येक मंदिराला नंबर दिला आहे. आणि बाजुला त्याचा इतिहास दिलेला आहे. वेळेअभावी आमची ती सर्व मंदिरे बघण्याची राहिली पण फिरता फिरता बरीच मंदिरे दिसली. प्रत्येक मंदिराला वेगवेगळा इतिहास आहे.

**८४ महादेव यात्रा सुची**

१)अगस्तेश्वर महादेव २)गुहेश्वर महादेव (३) ढूँढ़ेश्वर महादेव (४)डमरूकेश्वर महादेव (५)अनादिकल्पेश्वर महादेव (६)स्वर्णजालेश्वर महादेव (७)त्रिविष्टपेश्वर महादेव (८)कपालेश्वर महादेव (९)स्वर्गर्दारेश्वर महादेव (१०)श्रीकर्क्रोटेश्वर महादेव (११)सिद्धेश्वेर महादेव (१२)लोकपालेश्वेर महादेव (१३)मनकामनेश्वेर महादेव (१४)कुटुम्बेश्वर महादेव (१५)इंद्रधुम्नेश्वर महादेव (१६)ईशानेश्वर महादेव (१७)अप्सरेश्वर महादेव (१८)कलकलेश्वर महादेव (१९)नागचंद्रेश्वर महादेव (२०)प्रतिहारेश्वर महादेव (२१)कुक्कुटेश्वर महादेव (२२)कर्कटेश्वर महादेव (२३)मेघनादेश्वर महादेव (२४)महलायेश्वर महादेव (२५)मुक्तेश्वर महादेव (२६)सोमेश्वर महादेव (२७)अनरकेश्वर महादेव (२८)जटेश्वर महादेव (२९)रामेश्वर महादेव (३०)च्यवनेश्वर महादेव (३१) खंडेश्वर महादेव (३२) पत्तनेश्वर महादेव (३३) आनंदेश्वर महादेव (३४)कंथडेश्वर महादेव (३५) इन्द्रेश्वर महादेव (३६) मार्कंडेय महादेव (३७) शिवेश्वर महादेव (३८)कुसुमेश्वर महादेव (३९) अक्रुरेश्वर महादेव (४०) कुण्डेश्वर महादेवमंगलनाथ मंदिर (४१) लुम्पेश्वर महादेव (४२) मंगेश्वर महादेव (४३) अंगारेश्वर महादेव (४४)उत्तरेश्वर महादेव (४५) त्रीलोचनेश्वर महादेव (४६)वीरेश्वर महादेव (४७) नूपुरेश्वर महादेव (४८) अभयेश्वर महादेव (४९) पृथुकेश्वर महादेव (५०) स्थावरेश्वर महादेव (५१) शुक्लेश्वर महादेव (५२) ओंकारेश्वर महादेव (५३) विश्वेशवर महादेव (५४) नीलकंठेश्वर महादेव (५५) सिंहेश्वर महादेव (५६) रेवन्तेश्वर महादेव (५७)घंटेश्वर महादेव (५८) प्रयागेश्वर महादेव (५९)सिद्धेश्वर महादेव (६०) मातंगेश्वर महादेव (६१) सौभाग्येश्वर महादेव (६२) रुपेश्वर महादेव (६३)धनुसहस्त्रेश्वर महादेव (६४) पशुपतेश्वर महादेव (६५) ब्रह्मरेश्वर महादेव (६६) जल्पेश्वर महादेव (६७)केदारेश्वर महादेव (६८) पिशाचमुक्तेश्वर महादेव (६९) संगमेश्वर महादेव (७०) कुक्कुटेश्वर महादेव (७१)प्रयागेश्वर महादेव (७२) चंद्रदित्येश्वर महादेव (७३)करभेश्वर महादेव (७४) राजस्थलेश्वर महादेव (७५)बडलेश्वर महादेव (७६) अरुणेश्वर महादेव (७७) पुष्पदंतेश्वर महादेव (७८) अभिमुक्तेश्वर महादेव

(७९) हनुमत्केश्वर महादेव(८०) स्वप्नेश्वर महादेव (८१) द्वारपालेश्वर महादेव (८२) कायवरोनेश्वर महादेव (८३) बिल्वेश्वर महादेव (८४) दर्दुरेश्वर महादेव

दुसऱ्या दिवशी आम्ही उज्जैनच्या अवतीभवतीची मंदिरे पाहण्याचे ठरवले. ७-८ किमीच्या परिसरात ही सर्व मंदिरे आहेत.





## संदीपनी आश्रम

संदीपनी आश्रम सर्वात प्राचीन आणि उज्जैनच्या लोकप्रिय आश्रमांपैकी एक आहे. याचे नाव महान संत किंवा महर्षी संदीपनी यांच्या नावावरून ठेवले आहे. महर्षी संदीपनी भगवान श्री कृष्ण, बलराम आणि सुदामा यांचे गुरु होते. भगवान शिव यांचे मंदिर इथे आहे. भगवान शिव यांच्या समोर नंदी नेहमी बसलेला असतो. पण  ह्या मंदिरासमोर उभा आहे. आश्रमामध्ये गोमती कुंडदेखील आहे, जो प्राचीन काळापासून पाण्याचा पुरवठा करणारा स्रोत आहे. आश्रमात पावलांचे ठसे आहेत आणि असे समजले जाते की ही पाऊले भगवान श्रीकृष्णाची आहेत.

## काळ भैरव मंदिर

काळ भैरव मंदिर उज्जैनच्या भैरवगड येथील भगवान भैरवांचे मंदिर आहे. इथे खुप शांत वातावरण आहे. हे मुख्य शहरापासून ८ किमी दूर आहे. उज्जैनच्या या मंदिरात शिवा आपल्या भैरव स्वरूपात आहे. काल भैरवाला मद्यपान प्रिय आहे असे मानले जाते. कालभैरव ग्रहांच्या अडथळयांना हटविण्यासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे काळ भैरवाची पूजा केली जाते.






राजा विक्रमादित्य ह्याचा थोरला सावत्र भाऊ हा भर्तृहरी होता त्यांच्या नावावरून ह्या लेण्यांना हे नाव देण्यात आले. या लेणी पवित्र क्षिप्रा नदीजवळ आहेत. नीतिशतक, शृङ्गारशतक व वैराग्यशतक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शतकत्रय या संस्कृत भाषेतील ग्रंथसंग्रहाचा रचनाकार म्हणून हा राजा प्रसिद्ध आहे. याला पिंगला नामक पत्नी होती. या गुहा नैसर्गिक गुंफातील उत्तम उदाहरणांपैकी एक आहेत. गुहेच्या भिंतीवर शिल्पे आहेत जी त्या काळातल्या अनेक प्राचीन वस्तुंचे वर्णन करतात. आम्ही गेलो तेव्हा तेथिल स्थानिक लोक गाडी करुन आले होते. त्यामुळे गर्दी झाली होती. आत गेल्यावर पण गुदमरल्यासारखे होत होते. आत एक साधु महाराज बसले होते. ते कसे एवढ्या वेळ बसु शकतात असा आम्ही विचार करत होतो. दोनच छोट्या गुहा आहेत. आत एक साधु महाराज बसले होते. क्षिप्रा नदीच्या जवळ आहे म्हणून मोठ्या संख्येने पर्यटक येथे आले होते.

## मंगलनाथ मंदिर

मंगलनाथ मंदिर क्षिप्रा नदिच्या काठावर प्राचीन मंगलनाथ मंदिर आहे. मंगळाचे मंदिर फार कमी ठिकाणी असते. आणि उज्जैनला मंगळाचे जन्म स्थान मानले जाते. म्हणुन हे मंदिर फारच प्रसिद्ध आहे. इथे वर्षभर गर्दी असते. मंगळवारी तर फारच गर्दी असते. या मंदिरात 'भात पूजा' केल्यास मंगळ ग्रहाचे कुंडलीत असलेले दोष नाहीसे होतात असा समज आहे. मंगलनाथ मंदिराच्या बाहेर बॅटरी गाडी होती.








श्री दत्त मंदिर हरसिद्धि क्षेत्र - येथे वासुदेवानंद सरस्वती महाराज यांचे गंडाबंधन झाले होते.





## <u>उज्जैन वेधशाळा</u>




**बडा गणपती मंदिर -** हे मंदिर जुणे आहे. पण स्वच्छ:ता नाही.



**चारधाम मंदिर –** हे मंदिर उज्जैन शहरातच नदिच्या काठी आहे. चार धामाचे विहंगमय दर्शन घडवले आहे.





८४ महादेव मधिल एक नदीकाठील मंदिर



# ओंकारेश्वर

ॐकारेश्वर एक हिंदू मंदिर आहे. हे मध्य प्रदेशच्या खांडवा जिल्ह्यात आहे. हे नर्मदा नदीमध्ये मंधाता अथवा शिवपुरी नामक बेटावर वसलेले आहे. मध्यप्रदेशात प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी २ ज्योतिर्लिंगे आहेत. एक महाकाल नावाचे उज्जैन मध्ये, व दुसरे अमलेश्वर नावाचे ओंकारेश्वर येथे आहे.  हे मोरटक्का गावापासून जवळपास २० कि. मी. अंतरावर आहे.

## गजानन महाराज मंदिर

ओंकारेश्वरला सर्वात प्रथम आम्ही गजानन महाराज मंदिरामध्ये गेलो. तिथेच भक्तनिवासामध्ये आम्ही रुम घेतली होती. हे मंदिर मुख्य मंदिरापासुन एक कि. मी. अंतरावर आहे. येथील वातावरण अतिशय शांत, सुंदर आहे. सकाळ संध्याकाळ येथे नाममात्र शुल्क देवुन जेवण्याची सोय आहे.




इथे भगवान शिवचे दोन मुख्य मंदिर आहेत. एक ओमकारेश्वर आणि दुसरे मामलेश्वर महादेव मंदिर. देवी अहिल्याबाई होळकर यांच्या काळापासून येथे एका विशिष्ट दिवशी मातीची १८ हजार शिवलिंगे तयार करून, पूजा केल्यानंतर त्यांचे नर्मदेत विसर्जित करण्याची प्रथा आहे.. रात्री तेथे पोहचल्यावर आम्ही आणि दोन्ही मंदिरात जाउन दर्शन घेतले. ओमकारेश्वर मध्ये भक्त आणि पुजारी नर्मदा नदीची आरती करतात आणि दररोज संध्याकाळी नदीमध्ये दीपक प्रवाहित करतात त्याला दीपदान म्हणतात. सकाळी नर्मदा

नदीत बोटीने फेरी मारण्यासाठी चौकशी केली असता पाणी कमी असल्यामुळे बोट फेरी बंद असल्याचे कळाले.










ओंकारेश्वरतीर्थ क्षेत्रामध्ये चोवीस अवतार, माता घाट (सेलानी), सीता वाटिका, धावड़ी कुंड, मार्कण्डेय शिला, मार्कण्डेय संन्यास आश्रम, अन्नपूर्णाश्रम, विज्ञान शाला, बड़े हनुमान, खेड़ापति हनुमान, ओंकार मठ, माता आनंदमयी आश्रम, ऋणमुक्तेश्वर महादेव, गायत्री माता मंदिर, सिद्धनाथ गौरी सोमनाथ, आड़े हनुमान, माता वैष्णोदेवी मंदिर, चाँद-सूरज दरवाजे, वीरखला, विष्णु मंदिर, ब्रह्मेश्वर मंदिर, शेगावचे गजानन महाराज यांचे मंदिर, काशी विश्वनाथ, नरसिंह टेकडी, कुबेरेश्वर महादेव, चन्द्रमोलेश्वर महादेवाचे मंदिरसुद्धा वगैरे देवळे आहेत.

# देवास

सकाळी ओंकारेश्वर मधून निघाले असताना अचानक देवासला जाण्याचा निर्णय झाला. शिवाय देवासला देवीला जाण्यासाठी रोप वे आहे म्हटल्यावर विचार केला की कोमल, अद्वेदला पण ते आवडेल मग देवासला निघालो. देवास हे भारताच्या मध्य प्रदेश राज्यामधील एक शहर व देवास जिल्ह्याचे मुख्यालय आहे. देवास उज्जैनपासुन ३५ किमी अंतरावर आहे. भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटीश राजवटीदरम्यान देवास हे एक स्वतंत्र मराठा संस्थान होते. देवास मध्य प्रदेशातील सहाव्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. देवास मध्य प्रदेश राज्याचे औद्योगीक नगर आहे. भारत सरकारचे बैंक नोट मुद्रणालय देवास नगरात स्थित आहे. देवास शहराला त्याचे नाव शहरात स्थित चामुण्डा पर्वतामूळे प्राप्त झाले, ह्या पर्वताला टेकरी (३०० फिट उंची) ह्या नावाने ओळखले जाते.

कैला देवी मंदिर : देवासला जाताना तीन किमी अगोदर कैला देवी मंदिर आहे. तिथे ५१ फुट उंच हनुमान मंदिर आहे. हे मंदिर १९९५ मध्ये बांधण्यात आले. तिथे शंकराचे आणि शनि नवगृह मंदिर आहे. नंतर जेवुन आम्ही वरती देवासला चामुंण्डा देवीला गेलो. रोप वे तिकिट घर जवळ पार्किंगची सोय केलेली आहे. ही टेकडी शहराच्या अगदी मधोमध आहे.





# चामुंण्डा देवी

देवीला वरती जाणारा रस्ता. तेथील लोक ह्या मंदिराला टेकरी म्हणुनच ओळखतात.




चामुंण्डा देवीला जाताना आम्ही रोपवेने गेलो. रोपवेतुन दिसणारे खालचे शहर



या टेकडीमध्ये देवी चामुंडा (लहान माता) आणि तुळजा भवानी माता (बारी माता) चे दोन मोठे मंदिर आहे. चामुंडा मंदिर जवळच भैरव मंदिर आहे. हे एक गुहा मंदिर आहे. प्राचीन विश्वासानुसार ते विक्रमादित्य कारकिर्दीच्या काळाशी संबंधित आहे. सगळया मुर्ती अगदी डार्क कलर मध्ये आहेत त्यामुळे आपल्याला लगेच आकर्षित करतात.









मंदिराच्या रस्त्यात दिसलेली ४ नवी माकडे.






# गायत्री धाम

सेंधवा पासुन साधारण ७ कि. मी. हायवेच्या बाजुला  २० एकर जमिनीवर गायत्री धाम आहे. रस्त्याला लागूनच असल्याने आम्ही तेथे गेलो. गायत्री धामचा परिसर पहिल्या दृष्टीतच विश्रांती आणि मानसिक शांतीचा अनुभव देतो. संपूर्ण आश्रम म्हणजे नैसर्गिक वृक्ष, अध्यात्मिक वातावरण आणि सर्जनशील उपक्रमाचे अनुभव देतो. १९९५ मध्ये बसंत पंचमीच्या दिवशी गायत्री धामची स्थापना करण्यात आली.

गायत्री धाम येथे कामधेनु कुंज गोशाळा आहे. येथे राहणा येथे भारतीय ११९ सुंदर आणि निरोगी गाय आहेत. सर्व औषधे आणि निसर्गोपचार उपचार कामधेनु कुंजच्या उपउत्पादनावर आधारित आहेत. शेती आणि बायोगॅसमध्ये वापरल्या जाणारे जैविक खत तयार करण्यासाठी उपउत्पादनेदेखील वापरतात.

गायत्री धामचे अनेक आयुर्वेदिक उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तिथे आम्ही बरीच खरेदी केली.









प्रवासामध्ये घेतलेला एक निवांत क्षण ढाब्याच्या मागिल बाजु. आम्ही तिथे बसलो असता एक लोकल माणुस येउन त्याने ५० रुपयात जेन्टसचा मसाज करुन देतो असे सांगितले. त्याने खाटेवर बसुन मसाज करुन दिला. हे आमच्या सहलीमधले शेवटचे ठिकाण होते. त्यानंतर आम्ही १० वाजता ठाणेमध्ये पोहचलो.

एकंदरीत पाच दिवसाच्या धावपळीत आमची ट्रिप मस्त झाली होती.

आता पुढे भेटुया डिसेंबरमधील हैदराबादच्या सहा दिवसांच्या ट्रिप मध्ये...

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा  .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा हा नंबर7710980841किंवा . सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे .